अ.शा पत्र क्र.रामुमाआ/कार्यशाळा/निधी/२०१२
दिनांक — २० नोव्हेंबर २०१२

**RATNAKAR GAIKWAD**
Chief Information Commissioner

State Information Commission Maharashtra

**Phone : 022-2285 60 78**
**Fax : 022-2204 93 90**
E-mail : ratnakargaikwad@hotmail.com
13th Floor
New Administrative Building
Opposite Mantralaya
Madam Cama Road
Mumbai 400 032

प्रिय श्री.

Date :

आपणांस माहित आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू झाल्यानंतर समाजातील विविध घटकांना याबाबतची माहिती देणे या कायदयाचा उपयोग प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. या अधिनियमातील कलम-२६(१)खालीलप्रमाणे आहे.

२६. (१) **समुचित शासनाला, वित्तीय व इतर साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार----**

**(क) या अधिनियमान्वये अभिप्रेत असलेल्या अधिकारांचा वापर कसा करावयाचा यासाठी समाजाचे विशेषत: साजातील उपेक्षित वर्गाचे प्रबोधन करण्याकरिता शैक्षणिक कार्यक्रम तयार करता येतील व त्यांचे आयोजन करता येईल:**

**(ख) खंड (क) मध्ये निर्देश केलेले कार्यक्रम तयार करणे व त्यांचे आयोजन करणे, यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणांना सहभागी होण्यास आणि त्यांनी असे कायर्क्रम स्वत: हाती घेण्यास प्रोसाहन देता येईल ;**

**(ग) सार्वजनिक प्राधिकरणाव्दारा त्यांच्या उपक्रमांविषयीची अचूक माहिती योग्यवेळी व प्रभावीपणे प्रारित केली जाण्यास चालना देता येइल; आणि**

**(घ) सार्वजनिक प्राधिकरणाचे, यथास्थिती, केंद्रिय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांना, प्रशिक्षण देता येईल व सार्वजनिक प्रधिकरणांना त्यांच्या उपयोगाकरिता संबंधित प्रशिक्षण सामग्री पुरवता येईल.**

या संबंधी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांनी वर उल्लेख केलेल्या कलम- २६ (१) **(क)** प्रमाणे समाजात उपेक्षित असलेल्या वर्गाचे व इतर वर्गाचे प्रबोधन करण्याकरिता शैक्षणिक कार्यक्रम तयार करण्याचे ठरिवले आहे व त्याकरिता अलिकडेच राज्य स्तरावर समाजातील उपेक्षित वर्ग व इतर वर्गाच्या प्रबोधनासाठी माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती देऊन त्यासंबंधी या वर्गामध्ये जागरुकता निर्माण करण्याकरिता दि.३१.८.२०१२ रोजी यशदा, पुणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यांत आली होती, त्यास मी उपस्थित होतो. या कार्यशाळेत असे ठरविण्यांत आले की, यापुढे प्रत्येक जिल्हयात अशा प्रकारच्या समाजातील उपेक्षित वर्गासाठी/ इतर वर्गासाठी कार्यशाळा आयोजित करण्यांत यावी.

माझी आपणांस अशी विनंती आहे की, आपणाकडे उपलब्ध असलेल्या जिल्हा नियोजन अंदाजपत्रकातील नाविन्यपूर्ण कार्यक्रमांतर्गत (Innovative Programme) या कार्यशाळेचे आयोजन करण्यांत यावे. या शिर्षाखाली असलेल्या एकूण तरतूदींपैकी निदान १ टक्का रक्कम जर या कामासाठी खर्च करण्यात आली तरी त्याचा फार मोठा उपयोग समाजातील उपेक्षित वर्गासाठी/इतर वर्गासाठी होईल, हे लक्षात घेता, आपण याबाबत योग्यती कार्यवाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे, व यशदा,पुणे यांच्या समन्वयाने करावी, अशा सूचना आपणांस माहितीचा अधिकार अधिनियम २००५अतर्गत कलम- १९ (८) अंतर्गत देण्यांत येत आहेत.

आपला

(रत्नाकर गायकवाड)

प्रति,
श्री. कुणाल कुमार,
जिल्हाधिकारी.औरंगाबाद.

१.प्रत, श्री. डी.आर.परिहार, महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे, माहितीकरिता व कार्यवाहीस्तव.
२.महासंचालक, यशदा,पुणे माहितीकरिता व कार्यवाहीस्तव.